प्रेस नोट,

दिनांक :- ०४/१२/२०१७

**समर्थ पो.स्टे. परिसरात दहशत पसरविणा-या अट्टल गुन्हेगारावर एम.पी.डी.ए. कायदयान्वये स्थानबध्दतेची कारवाई**

समर्थ पो. स्टे. हद्दीत राहणारा गुन्हेगार इसम नामे राहूल बाबुलाल भाटी, वय ३२ वर्षे, रा. ३०९, सोमवार पेठ, पुणे हा अभिलेखावरील सराईत गुन्हे करणारा गुन्हेगार आहे. त्याने त्याचे साथीदारांसह देहूरोड, स्वारगेट, समर्थ पोलीस ठाणे हद्दीमध्ये लाकडी दांडके, कोयता यासारखी जीवघेणी हत्यारे बाळगुन खुन, पळवून नेणे, जबरी चोरी, खंडणी मागणे, बेकायदा शस्त्रे जवळ बाळगणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. त्याची गुन्हेगारी कृत्ये सन २००४ पासून चालू आहेत. त्याचेविरूध्द ४ गुन्हे दाखल आहेत. त्याचेविरूध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात येवून सुध्दा त्याचे गुन्हेगारी कृत्यावर काहीएक परिणाम होत नसलेचे दिसून आले होते. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परीसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जिवीताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

श्री. रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. राजेंद्र मोहिते, नेमणूक समर्थ पो. स्टे. यांनी एमपीडीए कायदयान्वये नमुद इसमास स्थानबध्द करण्याकामी प्रस्ताव तयार करुन मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचेकडे सादर केला होता. रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी प्रस्तावाची पडताळणी करुन नमुद इसमाचेविरुध्द दिनांक ०४/१२/२०१७ रोजी एमपीडीए कायदयान्वये एक वर्षाकरीता स्थानबध्दचे आदेश पारीत केले आहेत. त्यानुसार त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे स्थानबध्द करुन ठेवण्यात येत आहे.

रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी सक्रीय व दहशत निर्माण करणा-या अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंब केले नुसार चालु सालात २३ गुन्हेगारांना एमपीडीए कायदयान्वये स्थानबध्द केले आहे. तसेच १६ वेगवेगळया संघटित टोळयांचे विरूध्द मोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

---००----